# ।। ॐ श्री साईराम ।।
# 'साई पर्ल्स ऑफ व्हिजडम'
# साई ज्ञानमौक्तिके

भगवान साईबाबांच्या चरणकमलांना वंदन

भाग १७ अ

ॐ ॐ ॐ

प्रिय बंधू भगिनींनो!

स्वामींनी आपली भेट परत घडवून आणल्याबद्दल त्यांना धन्यवाद!

## स्वामींच्या दृष्टीने सर्वच पात्रे अतुलनीय

काल ज्यांच उल्लेख केला गेला नव्हता, असे काही मुद्दे आहेत. हा प्रसंग महाभागवतातील आहे. त्यात शिशुपाल नावाची एक व्यक्ती आहे. तो त्याच्या उद्धटपणाबद्दल आणि हिंसक वृत्तीबद्दल लोकांना माहीत होता. तो अतिशय दुर्गुणी आणि परमेश्वराबद्दल तिरस्कार करणारा होता. त्याने कृष्णाला सामोरे जाण्याचा प्रयत्न केला. त्यांला कृष्णाचा पराभव करायचा होता. तो कृष्णाला अपशब्द वापरून, त्याच्यावर टीका करून त्याच्यावर हल्ले करत असे. भगवान कृष्ण फक्त हसत असे, प्रतिक्रिया दाखवित नसे. त्याहीपेक्षा पुढे जाऊन तो म्हणाला, ''मी त्याचे शंभर अपराध चालवून घेईन.'' शंभर – खरोखर किती उदार राजा! (हशा) ''मी तुझे शंभर अपराध सहन करीन, पण जर तू ही सीमा पार केलीस, तर मी तुला संपवून टाकीन.''

आपला शब्द पाळण्यासाठी शिशुपालाचे शंभर अपराध होईपर्यंत कृष्ण थांबला. अखेर त्याने एकशे एक अपराध केले, तेव्हा श्रीकृष्णाने त्याचा शिरच्छेद केला. ते त्याने कसे केले? त्याने दिव्य शक्तीने भारलेले आणि प्रचंड वेगाने फिरत जाणारे चक्र (सुदर्शन चक्र) साडले. ते शिशुपालापर्यंत जाऊन त्याचे मस्तक छेदू शकले. हे घडताक्षणी, पाणी जसे कारंजातून उडावे तसे शिशुपालाचे रक्त उसळून कृष्णाच्या पायाशी पडले. ही गोष्ट फारच विलक्षण होती! शिशुपाल हा मूर्ख होता, हिंसक होता तरी त्याचे रक्त देवाच्या पायाशी सांडले! या गोष्टीचा गर्भितार्थ काय होता?

भगवानांनी शिशुपालाची भूमिका स्पष्ट करून सांगितली. मी तुम्हाला आधी सांगितल्याप्रमाणे, भगवान प्रत्येक व्यक्तीला एक उंची प्राप्त करून देतात. ते कुणालाही खालच्या पातळीवर गेलेला पाहत नाहीत. ते म्हणाले, ''शिशुपाल चांगला माणूस होता.'' तेव्हा मी विचारलं, ''स्वामी, शिशुपाल चांगला होता का?'' ''होय, तो चांगला माणूस होता.'' ''पण मग देवांशी स्पर्धा कशाला? तो कृष्णाचा एवढा द्वेष का करत होता?'' बाबांनी स्पष्ट करून सांगितलं, ''कृष्णाने रुक्मिणीशी रुक्माच्या बहिणीशी इच्छेविरुद्ध विवाह केला होता, त्याच्या अगदी मनाविरुद्ध. तिचा विवाह शिशुपालाबरोबर निश्चित कला होता. हेच कृष्णाबद्दलच्या द्वेषाचे मोठे कारण होते. कृष्णाचा द्वेष करायला दुसरे कोणतेही कारण नव्हते. म्हणून शिशुपाल हा वाईट माणूस नव्हता.'' मला याचे आश्चर्य वाटते की पौराणिक कथांमधील कोणत्याही भूमिकेला भगवान इतक्या उंचीवर कसे नेतात! तेच एकटे हे करू शकतात!

## 'शिष्यांची सेवा हीच स्वामींची सेवा'

आता तुमचं लक्ष आणखी एका दुसऱ्या प्रकरणाकडे वेधून घ्यायला आवडेल. भगवानांनी प्रशांती निलयमच्या आवारातील वसतीगृहाची देखभाल करणाऱ्या अधिकाऱ्यांना काही स्पष्ट सूचना दिल्या. ते काय म्हणाले, ''मला जर खूश करायचे असेल, आनंद द्यायचा असेल तर मुलांची चांगली काळजी घ्या. मला खूश करण्यासाठी किंवा माझी सेवा करायची असेल तर मुलांना चांगलं खाणं द्या. त्यांना चांगले जेवण द्या, पोटभर द्या, त्यांना पाहिजे

तितकं द्या आणि अन्न वाया घालवू नये असेही मुलांना सांगा. त्यांनी पैसे वाया घालवू नका असं सांगा, वेळ वाया घालवू नये असंही मुलांना सांगा. पैशाचा अपव्यय हे पाप आहे. वेळ वाया घालवणं हे आयुष्य वाया घालवण्यासारखं आहे. त्यांनी त्यांची शक्तीही वाया घालवू नये.'' मग हसून म्हणाले, ''मुलं सुखी असतील तर स्वामी आनंदी राहतील. हा मुद्दा समजून घ्या आणि त्याप्रमाणे वागणूक ठेवा.'' आणखी पुढे ते म्हणाले, ''तुम्ही तुमची तुलना बाह्य जगाशी करू नका. आपल्याला आपली तत्त्वे आणि मूल्ये आहेत. सत्य, प्रामाणिकपणा, शांतता आणि प्रेम. आपण आपली तत्त्वे पाळू या. आपण आपली तुलना दुसऱ्या कोणाबरोबर करू नये.'' त्यांनी वॉर्डनना सांगितले, ''आपल्या मुलांना बटाटे खायला द्या. बटाट्यामध्ये पुष्कळ पिष्टमय पदार्थ असतात, त्यामुळे मुलांचे वजनही वाढेल.'' (हशा)

मग ते पदवीधारक विद्यार्थ्यांकडे वळले. ''मुलांनो, खूप लवकरच तुम्ही तुमचा अभ्यास संपवाल. ज्यांनी तुम्हाला उच्चशिक्षित केले, त्या पालकांकडे घरी जा. आतापर्यंत तुमच्या पालकांनी तुम्हाला मोठे केले आहे. आता त्या पालकांची तुम्ही सेवा करण्याची वेळ आहे. तुम्ही त्यांची काळजी घ्यायची आहे. तुम्ही त्यांना आनंद दिला पाहिजे. तुम्ही त्यांचे आशीर्वाद घेतले पाहिजेत.''

माझ्या मित्रांनो, जेव्हा मी म्हणतो की विद्यार्थ्यांशी अशा पद्धतीने संभाषण करणारे असे कोणीही ह्या जगात नसेल, तेव्हा तुम्ही माझ्या या मताशी सहमत असाल. कुठेही, कुठलाही शिक्षक असेल का जो सांगेल की मुलांनो, पालकांची काळजी घ्या, मोठ्या माणसांना वंदन करा आणि तुमच्या पालकांना आनंद द्या? असं त्यांना कोण सांगेल? फक्त बाबाच– आपला धर्मपिताच!''

तेवढ्यात तिथे एक जबाबदार, ज्येष्ठ माणूस स्वामींच्या पाठीशी जवळ आला आणि त्याच्या कानात हळूच बोलला. भगवान त्याला म्हणाले, ''तुम्ही मला काहीही सांगायची गरज नाही. मला सर्व काही माहीत आहे. मी कोठे आहे असं तुम्हाला वाटतं? मी सर्वत्र आहे. मला तुम्ही काही सांगण्याची जरुरी नाही. तुम्ही सर्वांनी एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे की माशाला पोहायला कोणी शिकवलं? (हशा) कोणीही नाही. त्याचप्रमाणे कोणीही मला शिकवण्याची किंवा सांगायची गरज नाही. मला जन्मत:च सगळ्या गोष्टींचं ज्ञान होण्याची शक्ती मिळालेली आहे. मला सर्व काही माहीत आहे.''

## 'शिकवत असताना मुलांचे निरीक्षण करा'

ज्यामध्ये शिक्षकांना आणि विद्यार्थ्यांना काही सूचना आहे अशा काही मुलांकडे मी येतो. ''शिक्षकांनो, सावध रहा! जेव्हा तुम्ही प्रश्न विचारता, तेव्हा विद्यार्थी योग्य तऱ्हेने प्रतिक्रिया देतात किंवा नाही ह्याविषयी जागरूक राहा.'' स्वामींनी एक गंमतीदार उदाहरण दिलं. ''एका वर्गात शिक्षक विद्यार्थ्यांना स्पष्टीकरण करत होते. शेवटी शिक्षकांनी विचारलं, ''मुलांनो, मी काय बोललो ते समजलं का? सर्व काही आत शिरलं का? (हशा)'' तो मुलगा म्हणाला, ''सर, सगळं समजलं, पण फक्त तुमच्या मागची गोष्ट नाही समजली.'' त्याच वेळेस एक उंदीर पळत होता. तो वर्गातून बाहेर पळून जाण्याचा प्रयत्न करत होता. तो कोपऱ्यातल्या बिळात शिरला. सगळा आत शिरला पण शेपूट!'' म्हणून शिक्षकांनी विचारलं, ''मुला, मी आतापर्यंत तुम्हाला जे काही शिकवलं ते आत शिरलं का?'' ''सर, सगळं शिरलं पण शेपूट नाही.'' (हशा) म्हणून तुम्ही शिकवताना काळजीपूर्वक मुलांवर लक्ष ठेवलं पाहिजे.''

त्यावेळी तिथे हास्याच्या उकळ्या फुटल्या.

## ''मुलांनी चांगल्या प्रकारे इंग्रजी संभाषण शिकलं पाहिजे.''

नंतर स्वामी म्हणाले, ''मुलांनो, मला तुमच्याकडून खूप पत्रे आली आहेत. पण त्यामध्ये वर्णलेखनात (स्पेलिंग) खूप चुका आहेत.'' (हशा) वर्णलेखनाच्या चुका आजिबात व्हायला नकोत. तुम्ही खूप काळजी घेतली पाहिजे. उच्चार आणि आघातसुद्धा खूप चांगले असले पाहिजेत.'' स्वामींनी एक उदाहरण दिलं: ''एक

छोटा मुलगा वर्णलेखनाचा सराव करत होता. तो सकाळी उठला आणि वर्णलेखनाच्या सरावाला सुरुवात केली. त्यांनी 'मिल्क' या शब्दाच्या लेखनाचा सराव सुरू केला. त्याची आई बाहेर भांडी घासत होती. तो मुलगा 'मिल्क' या शब्दाचे वर्णाक्षर पाठ करत असल्याने ती धावतच आत आली आणि विचारलं, ''तुला काही होत आहे का?'' तिच्या विचारण्याचं कारण असं होतं की, 'मिल्क' या शब्दाचा घाईघाईने केलेला वर्णोच्चार असा वाटत होता. तो मुलगा ''मिल्लक, मिल्लक' असा उच्चार करत असताना ते 'अम्मा एलुका अम्मा एलुका' असं ऐकू येत होतं. तेलगुमध्ये 'एलुका' म्हणजे उंदीर. तिला असं वाटलं की तो मुलगा ''आई, तिथे उंदीर आहे'' असं म्हणतोय. तो मुलगा 'मिल्क' या शब्दाचा योग्य तऱ्हेने उच्चार करत नव्हता. म्हणून स्वामी सांगतात, की ''तुम्ही तुमच्या उच्चारांबद्दल काळजी घेतली पाहिजे.''

***